**वाचले-**

१ मा.मुख्य लेखा व वित्त अधिकारी तथा संचालक (वित्त),लेखा विभाग यांचेकडील पत्र क्रमांक लेखा/१अ/ कावि/ १३१७/२०२४, दिनांक २७/११/२०२४

२ महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील नियम १०(१)

३ परिपत्रक क्र.दवनि/१/कावि/९७/२०२२ दिनांक १४/०३/२०२२

४ मा.आयुक्त यांचेकडील दिनांक १६/१२/२०२४ रोजीचा मान्य प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
सामान्य प्रशासन विभाग
क्र.साप्रवि/३अ/कावि/१८६/२०२४
दिनांक १७ /१२/२०२४

**विषय :- श्री.गायकवाड आनंद जगन्नाथ, उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीबाबत... (सं.क्र.४०)**

**आदेश,**

श्री.गायकवाड आनंद जगन्नाथ, हे पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर "लिपिक" या पदावर दिनांक २२/१२/१९८७ रोजी रुजू झाले असून सद्यस्थितीमध्ये उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी या गट 'अ' मधील पदावर कार्यरत आहेत. श्री.गायकवाड आनंद जगन्नाथ, उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांची जन्मतारीख ०८/०१/१९६७ अशी असून दिनांक ०७/०१/२०२५ रोजी त्यांच्या वयास ५८ वर्षे पूर्ण होत आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील नियम १०(१) मधील तरतूदीनुसार श्री.गायकवाड आनंद जगन्नाथ, उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना दिनांक ३१/०१/२०२५ रोजी मध्यान्होत्तर महानगरपालिका सेवेमधून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त करणे आवश्यक आहे.

श्री.गायकवाड आनंद जगन्नाथ, उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचेकडून महानगरपालिकेस घरबांधणी अग्रिम, घर दुरुस्ती अग्रिम, संगणक अग्रिम, वाहन अग्रिम, कामगार कल्याण निधी अग्रिम, वैद्यकीय अग्रिम येणे बाकी नसून सद्यस्थितीत त्यांचेविरुध्द कोणत्याही प्रकारची खातेनिहाय चौकशी चालू अथवा प्रस्तावित नसलेने उपरोक्त वाचले क्र.१ चे पत्रान्वये विभागप्रमुखांनी श्री.गायकवाड आनंद जगन्नाथ, उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना नियत वयोमानाने सेवानिवृत्त करणेबाबत स्पष्टपणे शिफारस केली आहे.

सबब, मी उप आयुक्त, सामान्य प्रशासन विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका उपरोक्त वाचले क्र.४ चे मा.आयुक्त यांचेकडील मान्य प्रस्तावानुसार व उपरोक्त वाचले क्र.३ चे परिपत्रकान्वये आदेश निर्गमित करणेबाबत निश्चित केलेले धोरणानुसार तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील तरतूद विचारात घेता श्री.गायकवाड आनंद जगन्नाथ, उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना दिनांक ३१/०१/२०२५ रोजी मध्यान्होत्तर महानगरपालिका सेवेमधून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त करण्यास प्रस्तुत आदेशान्वये मान्यता देत आहे.

प्रस्तुत आदेशाची नोंद श्री.गायकवाड आनंद जगन्नाथ, उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे सेवानोंद पुस्तकात घेणेत यावी.

उप आयुक्त,
सामान्य प्रशासन विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११०१८

प्रति - श्री.गायकवाड आनंद जगन्नाथ, उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी
प्रत - लेखा विभाग

२/- श्री.गायकवाड आनंद जगन्नाथ, उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचेकडून महानगरपालिकेस येणे असलेली रक्कम त्यांना देय असणा-या रकमेतून वजा करुन उर्वरित रकमा त्यांना त्वरीत अदा करण्याची कार्यवाही करणेत यावी.

१.लेखापरिक्षण विभाग २.दूरसंचार विभाग ३.माहिती व जनसंपर्क विभाग ४.कामगार कल्याण विभाग
५.माहिती व तंत्रज्ञान विभाग ६.साप्रवि क्र. ७,१०,१२,२२,संगणक कक्ष ७.पिं.चिं.मनपा कर्मचारी महासंघ
८.सर्व संबंधित विभाग